**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१८/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश</u>**

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार सोमनाथ प्रकाश जाधव, रा. ४४६, जुनी मिल चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर यांनी त्यांच्या मालकीचा जप्त असलेला Redmi Note 14 5G 8GB मॉडेलचा मोबाईल, आयएमईआय क्र.86835807245609 हा सुप्रतनाम्यावर परत मिळण्याकरीता सादर केला आहे.

०२. अर्जदाराने सादर केले आहे की, त्याचा वर नमुद मोबाईल अपराध क्र. २०/२०२६, भारतीय न्याय संहितेचे कलम १२७(१) वगैरे अंतर्गत पोलीस स्टेशन, अक्कलकोट उत्तर यांनी जप्त केला आहे. सदरचा मोबाईल हा त्याच्या मालकीचा असून तो सदर मोबाईल दैनंदिन वापरात आणतो. त्याला त्या मोबाईलचा ताबा न मिळाल्यास त्याचे नुकसान होईल. त्यामुळे त्याने त्या मोबाईलचा सुप्रतनाम्यावर तात्पुरता ताबा देण्यात यावा अशी विनंती केली.

०३. तपासी अंमलदार यांना पुरेसी संधी देऊन देखील त्यांनी त्यांचे म्हणणे दिले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याविना पुढे चालविण्याचा आदेश निशाणी क्र.०१ वर पारीत करण्यात आलेला आहे. सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्र.०५ वर म्हणणे सादर करुन जप्त मुद्देमाल हा गु.र.क्र.२०/२०२६ मधील पुरावा असून तो परत केला तर अर्जदार तो विकण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर प्रकरणी मुद्देमाल हा अटीशर्ती घालून परत करण्यास हरकत नाही असे म्हणणे दिलेले आहे.

०४. अर्जाचे, उत्तरांचे आणि दस्ताऐवजांचे अवलोकन केले असता अर्जदार हा ४४६, जुनी मिल चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर येथील रहिवासी असल्याचे सादर केलेल्या आधारकार्डच्या प्रमाणित प्रतीवरुन निदर्शनास येते. अर्जदाराने मोबाईल त्याच्या नावे खरेदी केल्याबाबत एस.एस.मोबाईल, चौपाड विठ्ठल मंदिरापाठीमागे, नवी पेठ, सोलापूर यांनी जारी केलेली बिलाच्या प्रतीवरुन दिसून येते. जप्त मोबाईल हे अर्जदाराच्या नावे मालक म्हणून दर्ज असल्याचे आढळते. अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर कोणीही जप्त केलेल्या मोबाईल बाबत हक्क प्रस्थापीत केलेला नाही व अर्जदाराच्या हक्काला आक्षेप वा उजर नोंदविलेला नाही. अर्जदाराने

सदर मोबाईलवर त्याचा प्राथमिकरित्या हक्क सिद्ध केल्याने तो अंतरीमरित्या त्या मोबाईलच्या ताब्यास पात्र ठरतो. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज खालील आदेशाप्रमाणे निकाली काढण्यात येतो :-

**आ दे श**

१. अर्जदाराचा अर्ज खर्चाच्या आदेशाविना मंजूर करणेत येतो.

२. अर्जदार सोमनाथ प्रकाश जाधव, रा. ४४६, जुनी मिल चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर हा त्याच्या मालकीचा जप्त असलेला Redmi Note 14 5G 8GB मॉडेलचा मोबाईल, आयएमईआय क्र.868358072456O9 सुप्रतनाम्यावर अंतरीमरित्या मिळण्यास पात्र आहे व आयएमईआय क्रमांकाच्या तपासणीनंतर मोबाईल ताब्यात द्यावे.

३. अर्जदार सोमनाथ प्रकाश जाधव याने मोबाईल मिळाल्यानंतर त्याच्या रंगात कुठलाही बदल करणार नाही, ते कुणालाही हस्तांतरीत करणार नाही, कुठल्याही गुन्ह्यात वापरणार नाही व आदेशान्वये तो मोबाईल न्यायालयासमक्ष प्रस्तुत करेल अशी हमी घेवून त्याबाबत हमीपत्र (Indemnity Bond) रुपये ५०,०००/- दाखल करेल.

४. अर्जदार जप्त असलेल्या मोबाईलचे सर्व बाजुंनी छायाचित्र स्वखर्चाने गैरअर्जदार यांना काढून देईल व गैरअर्जदाराने ते दोषारोपपत्रासोबत दाखल करावे.

५. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येतो आणि प्रस्तुत प्रकरणातील सर्व दस्ताऐवज हे दोषारोपपत्राबरोबर जोडण्यात यावे.

MUKUL MUKUND KALYANKAR
Digitally signed by MUKUL MUKUND KALYANKAR
Date: 2026.04.18 15:04:48 +0530

(एम.एम. कल्याणकर)
न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी)
न्यायालय क्र.१, अक्कलकोट.

दिनांक :- १८.०४.२०२६.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.S.Mitragotri (Grade-III). |
| Court | : | Judicial Magistrate First Class, Akkalkot. |
| Date | : | 18.04.2026 |
| Judgment / Order signed by P. O. on | : | 18.04.2026 |
| Judgment / Order uploaded on | : | 18.04.2026 |